जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
तरुण भारत



कोल्हापूर : राजाराम कॉलेज परिसरात विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिम राबवली.

# राजाराम कॉलेजमध्ये स्वच्छता मोहीम

कोल्हापूर : राजाराम कॉलेजमध्ये 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविले. या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसर तसेच आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि राजाराम महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजाराम कॉलेज परिसरातील केएसबीपी पार्कपासून शिवाजी विद्यापीठाला लागून असलेल्या रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव प्रा. व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. टी. एम. चौगुले, राजाराम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनिता बोडके राजाराम महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. उमेश जगताप आणि डॉ. ज्योती चव्हाण, तसेच सहकार्य करणारे प्राध्यापक डॉ. शीतल तावरे, डॉ. रेखा नाईक आणि डॉ. अर्चना पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठास नवी क्षितिजे दाखविणारे कुलगुरू

## डॉ. डी. टी. शिर्के यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळाची आज सांगता

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळाची सोमवारी (दि. ६) यशस्वी सांगता करीत आहेत. कोव्हिडनंतर विद्यापीठाची पुन्हा सुरळीत केलेली घडी, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठाची शैक्षणिक फेररचना, कालसुसंगत नवीन अभ्यासक्रमांची सुरुवात करतानाच पायाभूत सुविधांचा व्यापक विकास व विस्तार, परीक्षा विभाग सुधारणा, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची प्रगती त्यांच्या काळात झाली. विद्यार्थी ते कुलगुरू असा त्यांचा प्रवास आहे.

**रँकिंगची चढती कमान**

डॉ. शिर्के यांच्या काळात 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनात विद्यापीठास ३.५२ सीजीपीए गुणांकनासह 'अ++' मानांकन मिळाले. केंद्राच्या 'एनआयआरएफ-२०२५'मध्ये शिवाजी विद्यापीठ देशात आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये कायम राहिले. अकृषी विद्यापीठांत देशातील आघाडीच्या ५० विद्यापीठांत स्थान मिळवले.



डॉ. डी. टी. शिर्के

**नवे उपक्रम, नवीन पुरस्कार**

विद्यापीठाच्या स्वतंत्र गीताची त्यांच्या कारकिर्दीत निर्मिती झाली. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. जे. एफ. पाटील पुरस्कार, शिववाणी कम्युनिटी रेडिओ सुरू झाला.

**नवी केंद्रे, नवे अभ्यासक्रम**

विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विविध नवे अभ्यासक्रम, केंद्रे त्यांनी सुरू केली. सायबर सिक्युरिटी अँड डेटा सायन्सेस विषयातील फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर, राजर्षी शाहू लोककला व संस्कृती केंद्र, सेंटर फॉर क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलीटी स्टडीज, सेंटर फॉर एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, इंटरनॅशनल रिलेशन्स, जिओइन्फॉर्मेटिक्स, ट्रॅव्हल अँड टुरिझम, फौंड्री टेक्नॉलॉजी यांची निर्मिती झाली.

**जागतिक संस्थांसमवेत करार**

विद्यापीठातील संशोधकांकडून ११ हजार ४५२ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले. या संशोधनास १ लाख ८४ हजार १३५ सायटेशन्स प्राप्त झाले. विद्यापीठाचे १०० हून अधिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांसमवेत सामंजस्य करार झाले. विविध संशोधनांसाठी १५० हून अधिक पेटंट मिळाले.

**महाविद्यालयांच्या कल्याणाचे धोरण :** ३ हजार ६२३ प्राध्यापकांच्या विविध टप्प्यांवरील स्थान निश्चिती, प्राचार्यपद अर्हतेसाठी संशोधन गुणांकनासाठी दाखल २४९ प्रस्ताव मार्गी लागले. विद्यापीठातील चार अधिविभागांना स्वायत्तता दिली.

**क्रीडापटूंना प्रोत्साहन**

शिवराज्याभिषेकदिनी रायगड स्वच्छता मोहीम, 'चला जाणू या नदीला' अभियानांतर्गत सांगली जिल्ह्यात कृष्णा नदी काठावरून आठ दिवसांची पदयात्रा काढली. कुस्ती संकुल व स्वतंत्र क्रीडा वसतिगृहाची उभारणी केली. विद्यार्थ्यांना क्रीडा शिष्यवृत्ती सुरू केली. त्यांनी मुंबई विद्यापीठाचाही अतिरिक्त कार्यभार पाहिला. कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठ तसेच वारणा समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात रविवारी 'तुकयाबंधू कान्होबा महाराज अभंगगाथा' प्रकाशित करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. यावेळी शेजारी डॉ. नंदकुमार मोरे, दिलीप कुलकर्णी, अरुण जाधव, व्ही. एन. शिंदे, तानाजी चौगुले, विनोद ठाकूर-देसाई, मेघा पानसरे आदी उपस्थित होते.

# मानवतेच्या जाणिवा सजग राखण्याची जबाबदारी विद्यापीठांची

## कुलगुरू डॉ. शिर्के; विद्यापीठात चार ग्रंथांचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : 'साहित्याच्या माध्यमातून समाजामध्ये मानवतेच्या जाणिवा सजग राखणे ही विद्यापीठांची जबाबदारी आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ कर्तव्यभावनेतून कार्यरत आहे', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात संत तुकाराम अध्यासन आणि विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित ग्रंथ प्रकाशन सोहळ्यामध्ये ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. दिलीप कुलकर्णी, अरुण जाधव प्रमुख उपस्थित होते.

संत तुकाराम अध्यासनातर्फे निरूपणकार मारुतीराव जाधव (तळाशीकर) गुरुजी यांची 'तुकयाबंधू कान्होबा महाराज अभंगगाथा' आणि प्रा. पां. ना. कुलकर्णी संपादित 'ज्ञानेश्वरी'ची दुसरी आवृत्ती, तसेच डॉ. मेघा पानसरे संपादित 'स्मृतिस्तंभ' आणि 'दि डायनॅमिक्स ऑफ साऊथ एशिया' या चार ग्रंथांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'साहित्य, इतिहास याविषयीची पुस्तके प्रकाशित करून त्या माध्यमातून विद्यापीठांनी सामाजिक जाणिवांना आवाहन करीत राहणे आवश्यक आहे. या जाणिवांमधूनच शिवाजी विद्यापीठाला पां. ना. कुलकर्णी, तळाशीकर गुरुजींसारखे लोक भेटले. वीस-वीस वर्षे अथक, अविश्रांत परिश्रम घेऊन त्यांनी अशा ग्रंथांच्या संपादनाचे कार्य केले. त्यांच्या या साधनेला विद्यापीठाने कर्तव्यभावनेतून समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले.'

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, तानाजी चौगुले, विनोद ठाकूर-देसाई, अवनीश पाटील उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. डॉ. मेघा पानसरे यांनी त्यांच्या संपादित पुस्तकांची माहिती दिली. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.

### विद्यापीठाने जनआवृत्ती काढावी

■ यावेळी डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी वडील पां. ना. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीच्या संधीप्रकाशात त्यांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरीचे प्रकाशन होणे ही हृदयबाब असल्याचे सांगितले. अरुण जाधव यांनी, तळाशीकर गुरुजींनी संपादित केलेली 'तुकारामबोवांची गाथा' आणि 'कान्होबा अभंगगाथा' या दोन्ही पुस्तकांच्या जनआवृत्ती काढण्यासाठी विद्यापीठाने प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

# साहित्याद्वारे मानवतेच्या जाणीवा सजग राखणे विद्यापीठांची जबाबदारी : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

## शिवाजी विद्यापीठात 'ज्ञानेश्वरी'सह चार महत्त्वपूर्ण ग्रंथांचे प्रकाशन




**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

साहित्याच्या माध्यमातून समाजामध्ये मानवतेच्या जाणीवा सजग राखणे ही विद्यापीठांची जबाबदारी आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ कर्तव्यभावनेतून कार्यरत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात संत तुकाराम अध्यासन आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रंथ प्रकाशन सोहळ्यामध्ये ते बोलत होते. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. दिलीप कुलकर्णी (कुरुंदवाड) आणि अरुण जाधव (तळाशी) प्रमुख उपस्थित होते.

संत तुकाराम अध्यासनातर्फे निरुपणकार मारुतीराव जाधव (तळाशीकर) गुरुजी यांची 'तुकयाबंधू कान्होबा महाराज अभंगगाथा' आणि प्रा. पां.ना. कुलकर्णी संपादित 'ज्ञानेश्वरी'ची दुसरी आवृत्ती तसेच डॉ. मेधा पानसरे संपादित 'स्मृतिस्तंभ' आणि 'दि डायनॉमिक्स ऑफ साऊथ एशिया' या चार ग्रंथांचे आजच्या कार्यक्रमात कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विज्ञान हे खरे तर वरदान ठरायला हवे, मात्र मानव स्वतःच्या स्वार्थापायी त्याचा विपरित वापर करीत आहे. विज्ञानाचा हा शास्वताकडून अशाश्वताकडील प्रवास चिंताजनक आहे. अशा वेळी संतसाहित्य हे वरदायी आशेचा किरण म्हणून सामोरे येते. साहित्य, इतिहास यांविषयीची पुस्तके प्रकाशित करून त्या माध्यमातून विद्यापीठांनी सामाजिक जाणीवांना आवाहन करीत राहणे आवश्यक आहे. या जाणीवांमधूनच शिवाजी विद्यापीठाला पां.ना. कुलकर्णी, तळाशीकर गुरुजींसारखे लोक भेटले. वीस-वीस वर्षे अथक, अविश्रांत परिश्रम घेऊन ते अशा ग्रंथांच्या संपादनाचे कार्य करतात. त्यांच्या या साधनेला विद्यापीठाने कर्तव्यभावनेतून समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यावेळी म्हणाले, क्रोध, अहंकार, लोभ ही जगातील युद्धाची प्रमुख कारणे आहेत. जगाने संतसाहित्याचा अभ्यास आणि अंगिकार केला असता, तर युद्धाचे प्रसंग ओढवलेच नसते. शिवाजी विद्यापीठाने दर्जेदार ग्रंथवैभव वाढविण्यासाठी सदैव प्रयत्न केले आहेत. त्याचे फलितस्वरुप आजची प्रकाशने आहेत.

यावेळी डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी आपले वडील पां.ना कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीच्या संधीप्रकाशात त्यांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरीचे प्रकाशन होणे ही हृद्य बाब असल्याचे सांगितले. अरुण जाधव यांनी तळाशीकर गुरूजींनी संपादित केलेली तुकारामबोवांची गाथा आणि कान्होबा अभंगगाथा या दोन्ही पुस्तकांच्या जनआवृत्ती काढण्यासाठी विद्यापीठाने प्रयत्न करावेत, अशी सूचना केली.

संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. मेधा पानसरे यांनी त्यांच्या संपादित पुस्तकांविषयी उपस्थितांना अवगत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.कार्यक्रमास वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, कुलकर्णी कुटुंबीय, जाधव कुटुंबीय, तळाशीचे ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 6 OCT 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कालिदास, तुकारामांच्या काव्यात मानवी तत्वज्ञान

## माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन

**महाकवी कालिदास आणि संत तुकाराम यांच्या काव्यांमध्ये मानवी जीवनामधील तत्वज्ञान सांगण्याच्या पध्दतीमध्ये साम्य आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.**

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासन आणि अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या सेवापूर्तीनिमित्त विशेष कार्यक्रम महाकवी कालिदास 'मेघदूत' कथन आणि विवेचन कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये केले होते. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सत्कार कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मान्यवर.

पुढे बोलताना माजी कुलगुरू डॉ. साळुंखे म्हणाले, शास्त्रीय संस्कृत काव्यांचे सम्राट म्हणजे कवी कालिदास. संत तुकारामांचे अभंग जीवनाशी आणि भक्तीशी जोडले आहे. दोघांच्या काव्यामध्ये रसिकता आणि माधुर्य आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांनी त्यांच्या सेवाकालखंडामध्ये अतिशय मनापासून सेवा दिलेली आहे. विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि विविध अधिकारमंडळाचे पदाधिकारी म्हणून उत्तम कार्य त्यांनी केलेले आहे.


प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, कोणत्याही क्षेत्रामध्ये स्थैर्य फार महत्वाचे असते. त्याशिवाय विकास होत नाही आणि विकासशिवाय प्रगती होत नाही.

संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. धनश्री लेले 'मेघदूत' कथन आणि विवेचनामध्ये म्हणाल्या, कवी कालीदास जेव्हा एखादी गोष्ट सांगतात तेव्हा त्याला प्रमाण देतात. मेघदूत वाचनाने प्रत्येक वेळेस एक नवी दृष्टी प्राप्त होत असते. यावेळी, अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठानचे अजय देशपांडे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. धनश्री लेले यांना मान्यवरांच्या हस्ते मानपत्र देऊन सत्कार केला. डॉ. गौरी कहाते यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ.नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. भारती पाटील, डॉ. मेधा पानसरे, कहाते कुटुंबीय, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ

# कालिदास, तुकारामांच्या तत्त्वज्ञान सांगण्याच्या पद्धतीत साम्य

## डॉ. साळुंखे : विद्यापीठात 'मेघदूत' कथन



कोल्हापूर, ता. ५ : 'शास्त्रीय संस्कृत काव्यांचे सम्राट म्हणजे कवी कालिदास. संत तुकारामांचे अभंग जीवनाशी आणि भक्तीशी जोडले आहेत. दोघांच्या काव्यामध्ये रसिकता आणि माधुर्य आहे. त्यांच्या काव्यांमध्ये मानवी जीवनामधील तत्त्वज्ञान सांगण्याच्या पद्धतीमध्ये साम्य आहे', असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात संत तुकाराम अध्यासन आणि अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान कोल्हापूरतर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित 'मेघदूत' कथन आणि विवेचन कार्यक्रमात ते बोलत होते.

संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. धनश्री लेले यांनी 'मेघदूत' कथन आणि विवेचन केले. कवी कालिदास जेव्हा एखादी गोष्ट सांगतात तेव्हा त्याला प्रमाण देतात. मेघदूत वाचनाने प्रत्येक वेळेस एक नवी दृष्टी प्राप्त होत असल्याचे त्यांनी सांगितले. अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठानचे अजय देशपांडे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. लेले यांना मान्यवरांच्या हस्ते मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. गौरी कहाते यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी डॉ. भारती पाटील, डॉ. मेधा पानसरे, कहाते कुटुंबीय उपस्थित होते. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### विद्यापीठ-समाज एकत्र येण्याकडे लक्ष हवे

■ कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठ आणि समाज दोघेही एकत्र कसे येतील, एकमेकांशी बांधले जातील, याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. त्यात अध्यासनांचे कार्य मोठे आहे.' प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'कोणत्याही क्षेत्रामध्ये विकास, प्रगतीसाठी स्थैर्य फार महत्त्वाचे असते. विद्यापीठाला स्थैर्यता देण्याचे कार्य कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवला तरच विद्यापीठ आणि पर्यायाने समाजाचा विकास होतो.'

0 6 OCT 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात संख्याशास्त्र विभाग सभागृहाचे उद्‌घाटन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहाचे उद्घाटनप्रसंगी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. शशिभूषण महाडिक आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संख्याशास्त्र अधिविभागासाठी अत्याधुनिक आणि प्रशस्त अशा सभागृह उभारणीच्या रूपाने या विभागाच्या सर्वच पूर्वसुरींनी पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता केल्याचे समाधान वाटत आहे, अशी कृतज्ञ भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या भव्य आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज सभागृहाचे उद्घाटन शनिवारी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यांनी या सभागृहामुळे विद्यापीठाच्या वैभवात एक नितांत सुंदर भर पडल्याची भावना व्यक्त केली. डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत केले. अधिविभाग प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी संख्याशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते कोनशिला अनावरण करण्यात आले, तर कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते फीत कापून इमारतीत प्रवेश करण्यात आला.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. डी. एन. काशीद, डॉ. एच. व्ही. कुलकर्णी, डॉ. संतोष सुतार, डॉ. कृष्णा पाटील, संगणक विभाग संचालक अभिजित रेडेकर, अभियांत्रिकी उपकुलसचिव रणजित यादव यांच्यासह संख्याशास्त्र अधिविभागाचे शिक्षक, अभियांत्रिकी, संगणक, इंटरनेट आदी विभागांचे अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2025
पुण्यनगरी

# 'संख्याशास्त्र सभागृहा'च्या उद्घाटनाने समाधान

## – कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संख्याशास्त्र अधिविभागासाठी अत्याधुनिक आणि प्रशस्त अशा सभागृह उभारणीच्या रूपाने या विभागाच्या सर्वच पूर्वसुरींनी पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता केल्याचे समाधान वाटत आहे, अशी कृतज्ञ भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या सुसज्ज सभागृह उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आजचे युग डेटाचे आहे. डेटा विश्लेषणाला मोठे महत्त्व आहे. त्यामुळे या विषयाला प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या विद्यार्थ्यांच्या एकत्रित व्याख्यानांसाठी मोठ्या सभागृहाची आवश्यकता होती. विद्यार्थ्यांनी आणि विद्यापीठाने या सुविधेचा वापर करावा. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी या सभागृहामुळे विद्यापीठाच्या वैभवात एक नितांत सुंदर भर पडल्याची भावना व्यक्त केली. डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत, अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी विद्यार्थ्यांच्या हस्ते कोनशिला अनावरण झाले, तर कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते फीत सोडवून इमारतीत प्रवेश करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. डी. एन. काशीद, डॉ. एच. व्ही. कुलकर्णी, डॉ. संतोष सुतार, डॉ. कृष्णा पाटील, अभिजित रेडेकर, रणजित यादव, डॉ. गिरीश कुलकर्णी, कल्याण देवरूखकर, अमित कांबळे, विजय पोवार, शिवकुमार ध्याडे, रवी सातपुते आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ



कोल्हापूर : आयडिया लॅबसाठी ५० लाख रुपयांच्या दायित्व निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना सचिन मेनन. शेजारी मान्यवर.

# 'आयडिया लॅब'साठी मेनन समूहातर्फे ५० लाखांचा निधी

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (ए.आय.सी.टी.ई.)-'आयडिया लॅब' (आयडिया डेव्हलपमेंट, इव्हॅल्युएशन अँड ॲप्लिकेशन लॅब) स्थापित करण्यासाठी मेनन समूहातर्फे सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) अंतर्गत ५० लाख रुपयांच्या निधीचा धनादेश मेनन समूहाचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे हस्तांतरित केला.

मेनन म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ हे असे ठिकाण आहे, जिथे तरुण मने घडवली जातात. उद्योग जगतातील लोक म्हणून आम्ही व्यवसायासाठी योग्य परिसंस्था तयार करू शकतो, परंतु खरी शैक्षणिक आणि विषयानुषंगिक जडणघडण फक्त विद्यापीठच करू शकते. स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथून बाहेर पडणारे विद्यार्थी उद्योग क्षेत्राशी थेट जुळवून घेऊ शकतील, तसेच उद्योग जगतातील घडामोडींचा अचूक वेध घेऊ शकतील, या दृष्टीने आयडिया लॅब उपयुक्त ठरणारी आहे. ही लॅब या भागातील सर्वाधिक गुणवत्तापूर्ण होण्याकरिता मेनन समूह सदैव विद्यापीठाबरोबर राहील.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयडिया लॅबसाठी ५० लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना मेनन समूहाचे चेअरमन सचिन मेनन. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

# शिवाजी विद्यापीठ 'आयडिया लॅब'साठी मेनन समुहातर्फे ५० लाखांचा निधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (ए.आय.सी.टी.ई.) आयडिया लॅब (आयडिया डेव्हलपमेंट, इव्हॅल्युएशन अँड ॲप्लिकेशन लॅब) स्थापित करण्यासाठी मेनन उद्योग समूहातर्फे सामाजिक दायित्व निधी अंतर्गत ५० लाख निधी देण्यात आला. निधीचा धनादेश मेनन समूहाचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे देण्यात आला.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेसचे संचालक डॉ. एस. डी. डेळेकर, सुभाष माने, हर्षवर्धन पंडित उपस्थित होते. मेनन समूहातर्फे कार्यकारी संचालक शरण्या मेनन, देविका मेनन, निवेदिता मेनन, समूहाचे प्रेसिडेंट आर. डी. दीक्षित, व्हाईस प्रेसिडेंट अमित देशपांडे व मिलिंद धोपेश्वरकर, प्रमोद सूर्यवंशी, अनिल पुरोहित, योगेश देशमुख उपस्थित होते. संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी प्रास्ताविक, तर आयडिया लॅब समन्वयक डॉ. पी. डी. पाटील यांनी आयडिया लॅबची माहिती दिली. लॅबचे सह-समन्वयक डॉ. एस. बी. चव्हाण यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागातर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये माजी विद्यार्थी मेळावा घेण्यात आला.

# माजी विद्यार्थ्यांचा आठवणींना उजाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील मेळाव्यात संख्याशास्त्र अधिविभागाचे १९८५ ते २०२५ पर्यंतच्या विविध बॅचमधील सुमारे १४० माजी विद्यार्थी, तसेच १०० आजी विद्यार्थी सहभागी झाले. त्यातील माजी विद्यार्थ्यांनी आठवणींना उजाळा देत विद्यार्थिदशेतील अनुभव, शैक्षणिक प्रवास, व्यावसायिक यशोगाथा मांडल्या.

'या अधिविभाग आणि विद्यार्थ्यांच्या कारकिर्दीसाठी आपले मार्गदर्शन व सहकार्य सदैव उपलब्ध असेल', अशी ग्वाही माजी विद्यार्थ्यांनी दिली. या मेळाव्याचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी डॉ. डी. एन. काशीद, एच. व्ही. कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

माजी विद्यार्थी आणि विभागातील पीजी विद्यार्थ्यांमध्ये संवाद सत्र घेण्यात आले. यावेळी भावी करिअरच्या संधी, सांख्यिकी शिक्षणाची उपयुक्तता आणि उद्योग-जगतातील डेटा सायन्सचे महत्त्व, या विषयांवर चर्चा झाली. माजी विद्यार्थी समन्वयक डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी विभागाचा आढावा सादर केला. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले. डॉ. सचिन पाटील, प्रा. संजय गांजवे, संजय पाटील, अमोल चव्हाण, तुकाराम कांबळे, उल्का दिंडे यांनी मेळाव्याचे संयोजन केले.

## माजी विद्यार्थी तेजस्वी तारे

'विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी हे आपल्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रांत झळकणारे तेजस्वी तारे आहेत. त्यांचा शिक्षक म्हणून आम्हाला अतिशय अभिमान वाटतो', असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले.

0 6 OCT 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वनस्पतींपासून तयार केले 'कीटकनाशक'

## शिवाजी विद्यापीठाचे संशोधन; वनस्पतींच्या दुधाळ रसापासून बनविलेल्या जैवकीटकनाशकाला जर्मन पेटंट

- **युफोर्बिएसी कुळातील वनस्पतींचा वापर**
- **कोबी, मिरचीवरील मावा, फुलकिड्यांवर प्रभावी**

**कोल्हापूर : आशिष शिंदे**

सावरकांड, शेराचे झाड या शेंदरी कुळातील वनस्पतींच्या दुधाळ रसावर (लॅटेक्स) प्रक्रिया करून कीड नियंत्रण करणारे जैवकीटकनाशक शिवाजी विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांनी तयार केले आहे. युफोर्बिएसी कुळातील या वनस्पतींच्या रसाचा वापर करून बनविलेल्या बायोपेस्टिसाईड फॉर्म्युलेशनला जर्मनीकडून उपयुक्त पेटंट मिळाले आहे. कोबी, मिरची, वांगी यासारख्या पिकांवरील मावा, फुलकिडे, पांढऱ्या माश्यांवर हे जैवकीटकनाशक प्रभावी असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

युफोर्बिएसी हे जगभर पसरलेले मोठे वनस्पती कुल असून, त्यातील अनेक जातींमध्ये पांढरट दुधाळ रस आढळतो. या रसामध्ये जैव सक्रिय घटक असतात. त्यामध्ये कीटकनाशक, जीवाणूनाशक व बुरशीनाशक गुणधर्म असतात.





### नैसर्गिक रसायनांनी समृद्ध

युफोर्बिएसी हे एक वनस्पतींचे मोठे कुळ आहे, ज्याला मराठीत दूधवर्गीय वनस्पती म्हणतात. वनस्पतींच्या या कुळात ३०० पेक्षा जास्त प्रजाती आणि ७ हजार ५०० हून अधिक जाती आहेत. या कुळातील बहुतांश वनस्पतींचे खोड, पाने किंवा फळ कापल्यावर दुधाळ पांढरट रस बाहेर येतो. हा रस नैसर्गिक रसायनांनी समृद्ध असतो.

### असे झाले जैवकीटकनाशक

या वनस्पतींच्या खोडातून आणि पानांतून दुधासारखा रस गोळा करण्यात आला. नंतर हा रस थंड तापमानात वाळवून त्याची बारीक पावडर करण्यात आली. या पावडरला पर्यावरणास सुरक्षित अशा द्रव पदार्थामध्ये (हरित सॉल्व्हेंट) मिसळून आणि औषध पानांवर नीट पसरावे म्हणून विशेष मिश्रक (सर्फक्टंट) घालून द्रवरूप जैवकीटकनाशक तयार करण्यात आले.

> जैवकीटकनाशकामुळे शेतकऱ्यांचे रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करता येईल. पिकांवरील अवशेष आणि पर्यावरणीय प्रदूषण टाळण्यास मदत होईल व शाश्वत शेतीला चालना मिळेल.
>
> **- सागर जाधव, संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ**

संशोधकांनी सावरकांड (युफोर्बिया अँटिक्वोरम) आणि शेराचे झाड (युफोर्बिया तिरुकल्ली) या वनस्पतींतील दुधाळ रसावर प्रयोग करून कीटकनाशक तयार केले आहे.

हे कीटकनाशक कोबीवरील मावा (ब्रेविकोरीन ब्रॅसिका) आणि मिरचीवरील फुलकिडे (थ्रिप्स परविस्पिनस) यासारख्या वनस्पतींतील रसशोषक किडींवर प्रभावी आहे. याशिवाय नैसर्गिक पॉलिमर घटकांमुळे औषध फवारणीनंतर पिकांच्या पानांवर अधिक काळ टिकते व पावसामुळे धुवून जाण्याची शक्यता कमी होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
लोकमत

# कुलगुरू, प्रकुलगुरूंना आज निरोप

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याबद्दल आज सोमवारी दुपारी ३ वाजता राजर्षी शाहू सभागृहात त्यांना विशेष समारंभात निरोप देण्यात येणार आहे. यावेळी विद्यापीठातील सर्व विद्यार्थी, अधिकार मंडळाचे सदस्य, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच सेवक उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ कबड्डी संघाची अखिल भारतीय स्पर्धेकरिता निवड

कोल्हापूर : प्रतिनिधी

इंदोर (मध्य प्रदेश) येथे चालू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा संघ डॉ. होमी भाभा विद्यापीठ मुंबई या संघावर विजय प्राप्त करून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

अत्यंत चुरशीने झालेल्या या सामन्यामध्ये मध्यंतरापर्यंतचा स्कोर शिवाजी विद्यापीठ १४ व होमी भाभा विद्यापीठ १३ असा होता.

अंतिम पाच मिनिटांमध्ये सौरभ फगरे यांच्या चढाया व अवधूत आदित्य पवार यांनी केलेल्या पकडींच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाने हा सामना सहा गुणांनी जिंकला (३२-२८). देवेंद्र बिरनाळे, संजय पाटील संघाचे प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत. प्राचार्य बाबासाहेब उलपे (अध्यक्ष) आणि अयुब कच्ची यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज माध्यम संवाद परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठ विकास मंच, वृत्तपत्र विद्या व जनसंपर्क विभाग आणि विश्व संवाद केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ६) सकाळी ११.३० वाजता निलांबरी हॉल, वनस्पतिशास्त्र अधिविभाग येथे 'माध्यम संवाद परिषद- २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत राज्याचे उच्चशिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांचे 'ट्रम्प.. टॅरिफ आणि मीडिया' या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. विद्यापीठ विकास मंचचे प्रांत संयोजक एन. डी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, वृत्तपत्रविद्या व जनसंपर्क विभाग प्रमुख प्रा. डॉ. निशा मुंडे, विद्यापीठ विकास मंचचे निमंत्रक स्वागत परूळेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
पुण्यनगरी

# शिलालेखात भाषेची विविध रूपे : डॉ. शेळके

**कोल्हापूर :** शिलालेख हा भाषेच्या प्रवासाचे दाखले देणारा ऐतिहासिक आणि विश्वासार्ह वारसदार असून, या शिलालेखांमध्ये भाषेची विविध रूपे सापडतात, असे प्रतिपादन शिलालेख अभ्यासक डॉ. नीलेश शेळके यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'निमित्त आयोजित 'शिलालेखातील मराठी' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे होते. डॉ. शेळके म्हणाले, शिलालेख ही मराठी भाषेची समृद्धी आहे. शिलालेखांतून भाषेचा, राजवटींचा इतिहास ज्ञात होतो. जीर्णोद्धाराच्या नावाखाली आपण सांस्कृतिक इतिहास गाडत निघालो आहोत. अशा वेळी तरुण अभ्यासकांनी शिलालेखांचे जतन, वाचन करण्यासाठी पुढे येणे नितांत गरजेचे आहे. अध्यक्षीय मनोगतात डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, पुस्तकांच्या बाहेरचे ज्ञानक्षेत्र म्हणून शिलालेख अभ्यासाकडे पाहिले पाहिजे. मराठी भाषेला विस्तारणारे क्षेत्र म्हणून संशोधकांनी याकडे वळण्याची आवश्यकता आहे. रूपाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
तरुण भारत



कोल्हापूर : राजाराम कॉलेज परिसरात विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिम राबवली.

# राजाराम कॉलेजमध्ये स्वच्छता मोहीम

कोल्हापूर : राजाराम कॉलेजमध्ये 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविले. या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसर तसेच आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि राजाराम महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजाराम कॉलेज परिसरातील केएसबीपी पार्कपासून शिवाजी विद्यापीठाला लागून असलेल्या रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव प्रा. व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. टी. एम. चौगुले, राजाराम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनिता बोडके राजाराम महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. उमेश जगताप आणि डॉ. ज्योती चव्हाण, तसेच सहकार्य करणारे प्राध्यापक डॉ. शीतल तावरे, डॉ. रेखा नाईक आणि डॉ. अर्चना पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ

# पणदूरकर दांपत्याचे पंतप्रधान मदत निधीसाठी दहा लाख

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सेवानिवृत्त प्राध्यापक ॲड. राम पणदूरकर आणि त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी मराठवाडा, उत्तर भारतातील पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीकरिता दहा लाख रुपयांची देणगी दिली. त्यांनी या देणगीच्या रकमेचा धनादेश पीएमओ, साऊथ ब्लॉक, दिल्ली येथे पाठविला आहे. यापूर्वी पहलगाम हल्ला, सिंदूर ऑपरेशनमध्ये शहीद झालेल्यांसाठी डॉ. पणदूरकर यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पाच लाख रुपयांची देणगी राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी दिली. देशातील आपत्तीवेळी आम्ही मदत करत राहणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले होते. पणदूरकर दांपत्याने त्यांची दिवंगत कन्या ॲड. रूपाली यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शिवाजी विद्यापीठाला ६० लाख रुपयांची देणगी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठास नवी क्षितिजे दाखविणारे कुलगुरु

## डॉ. डी. टी. शिर्के यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळाची आज सांगता

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळाची सोमवारी (दि. ६) यशस्वी सांगता करीत आहेत. कोविडनंतर विद्यापीठाची पुन्हा सुरळीत केलेली घडी, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठाची शैक्षणिक फेररचना, कालसुसंगत नवीन अभ्यासक्रमांची सुरुवात करतानाच पायाभूत सुविधांचा व्यापक विकास व विस्तार, परीक्षा विभाग सुधारणा, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची प्रगती त्यांच्या काळात झाली. विद्यार्थी ते कुलगुरू असा त्यांचा प्रवास आहे.

**रँकिंगची चढती कमान**


डॉ. शिर्के यांच्या काळात 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनात विद्यापीठास ३.५२ सीजीपीए गुणांकनासह 'अ++' मानांकन मिळाले. केंद्राच्या 'एनआयआरएफ-२०२५'मध्ये शिवाजी विद्यापीठ देशात आघाडीच्या २०० शैक्षणिक संस्थांमध्ये कायम राहिले. अकृषी विद्यापीठांत देशातील आघाडीच्या ५० विद्यापीठांत स्थान मिळवले.

**नवे उपक्रम, नवीन पुरस्कार**

विद्यापीठाच्या स्वतंत्र गीताची त्यांच्या कारकिर्दीत निर्मिती झाली. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. जे. एफ. पाटील पुरस्कार, शिववाणी कम्युनिटी रेडिओ सुरू झाला.

**नवी केंद्रे, नवे अभ्यासक्रम**

विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विविध नवे अभ्यासक्रम, केंद्रे त्यांनी सुरू केली. सायबर सिक्युरिटी अँड डेटा सायन्सेस विषयातील फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर,


डॉ. डी. टी. शिर्के

राजर्षी शाहू लोककला व संस्कृती केंद्र, सेंटर फॉर क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलीटी स्टडीज, सेंटर फॉर एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, इंटरनॅशनल रिलेशन्स, जिओइन्फॉर्मेटिक्स, ट्रॅव्हल अँड टुरिझम, फौंड्री टेक्नॉलॉजी यांची निर्मिती झाली.

**जागतिक संस्थांसमवेत करार**

विद्यापीठातील संशोधकांकडून ११ हजार ४५२ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले. या संशोधनास १ लाख ८४ हजार १२५ सायटेशन्स प्राप्त झाले. विद्यापीठाचे १०० हून अधिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांसमवेत सामंजस्य करार झाले. विविध संशोधनांसाठी १५० हून अधिक पेटंट मिळाले.

**महाविद्यालयांच्या कल्याणाचे धोरण :** ३ हजार ६२३ प्राध्यापकांच्या विविध टप्प्यांवरील स्थान निश्चिती, प्राचार्यपद अर्हतेसाठी संशोधन गुणांकनासाठी दाखल २४९ प्रस्ताव मार्गी लागले. विद्यापीठातील चार अधिविभागांना स्वायत्तता दिली.

**क्रीडापटूंना प्रोत्साहन**

शिवराज्याभिषेकदिनी रायगड स्वच्छता मोहीम, 'चला जाणू या नदीला' अभियानांतर्गत सांगली जिल्ह्यात कृष्णा नदी काठावरून आठ दिवसांची पदयात्रा काढली. कुस्ती संकुल व स्वतंत्र क्रीडा वसतिगृहाची उभारणी केली. विद्यार्थ्यांना क्रीडा शिष्यवृत्ती सुरू केली. त्यांनी मुंबई विद्यापीठाचाही अतिरिक्त कार्यभार पाहिला. कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठ तसेच वारणा समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारी 'तुकयाबंधू कान्होबा महाराज अभंगगाथा' प्रकाशित करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. यावेळी शेजारी डॉ. नंदकुमार मोरे, दिलीप कुलकर्णी, अरुण जाधव, व्ही. एन. शिंदे, तानाजी चौगुले, विनोद ठाकूर-देसाई, मेधा पानसरे आदी उपस्थित होते.

# मानवतेच्या जाणिवा सजग राखण्याची जबाबदारी विद्यापीठांची

## कुलगुरू डॉ. शिर्के; विद्यापीठात चार ग्रंथांचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : 'साहित्याच्या माध्यमातून समाजामध्ये मानवतेच्या जाणिवा सजग राखणे ही विद्यापीठांची जबाबदारी आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ कर्तव्यभावनेतून कार्यरत आहे', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात संत तुकाराम अध्यासन आणि विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित ग्रंथ प्रकाशन सोहळ्यामध्ये ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. दिलीप कुलकर्णी, अरुण जाधव प्रमुख उपस्थित होते.

संत तुकाराम अध्यासनातर्फे निरूपणकार मारुतीराव जाधव (तळाशीकर) गुरुजी यांची 'तुकयाबंधू कान्होबा महाराज अभंगगाथा' आणि प्रा. पां. ना. कुलकर्णी संपादित 'ज्ञानेश्वरी'ची दुसरी आवृत्ती, तसेच डॉ. मेधा पानसरे संपादित 'स्मृतिस्तंभ' आणि 'दि डायनॅमिक्स ऑफ साऊथ एशिया' या चार ग्रंथांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'साहित्य, इतिहास याविषयीची पुस्तके प्रकाशित करून त्या माध्यमातून विद्यापीठांनी सामाजिक जाणिवांना आवाहन करीत राहणे आवश्यक आहे. या जाणिवांमधूनच शिवाजी विद्यापीठाला पां. ना. कुलकर्णी, तळाशीकर गुरुजींसारखे लोक भेटले. वीस-वीस वर्षे अथक, अविश्रांत परिश्रम घेऊन त्यांनी अशा ग्रंथांच्या संपादनाचे कार्य केले. त्यांच्या या साधनेला विद्यापीठाने कर्तव्यभावनेतून समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले.'

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, तानाजी चौगुले, विनोद ठाकूर-देसाई, अवनीश पाटील उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. डॉ. मेधा पानसरे यांनी त्यांच्या संपादित पुस्तकांची माहिती दिली. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.

### विद्यापीठाने जनआवृत्ती काढावी

■ यावेळी डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी वडील पां. ना. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीच्या संधीप्रकाशात त्यांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरीचे प्रकाशन होणे ही हृदयबाब असल्याचे सांगितले. अरुण जाधव यांनी, तळाशीकर गुरुजींनी संपादित केलेली 'तुकारामबोवांची गाथा' आणि 'कान्होबा अभंगगाथा' या दोन्ही पुस्तकांच्या जनआवृत्ती काढण्यासाठी विद्यापीठाने प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

न्यूज & व्ह्यूज

0 6 OCT 2025
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साहित्याद्वारे मानवतेच्या जाणीवा सजग राखणे विद्यापीठांची जबाबदारी : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

## शिवाजी विद्यापीठात 'ज्ञानेश्वरी'सह चार महत्त्वपूर्ण ग्रंथांचे प्रकाशन




कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ):

साहित्याच्या माध्यमातून समाजामध्ये मानवतेच्या जाणीवा सजग राखणे ही विद्यापीठांची जबाबदारी आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ कर्तव्यभावनेतून कार्यरत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात संत तुकाराम अध्यासन आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रंथ प्रकाशन सोहळ्यामध्ये ते बोलत होते. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. दिलीप कुलकर्णी (कुरुंदवाड) आणि अरुण जाधव (तळाशी) प्रमुख उपस्थित होते.

संत तुकाराम अध्यासनातर्फे निरुपणकार मारुतीराव जाधव (तळाशीकर) गुरुजी यांची 'तुकयाबंधू कान्होबा महाराज अभंगगाथा' आणि प्रा. पां.ना. कुलकर्णी संपादित 'ज्ञानेश्वरी'ची दुसरी आवृत्ती तसेच डॉ. मेधा पानसरे संपादित 'स्मृतिस्तंभ' आणि 'दि डायनॅमिक्स ऑफ साऊथ एशिया' या चार ग्रंथांचे आजच्या कार्यक्रमात कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विज्ञान हे खरे तर वरदान ठरायला हवे, मात्र मानव स्वतःच्या स्वार्थापायी त्याचा विपरित वापर करीत आहे. विज्ञानाचा हा शाश्वताकडून अशाश्वताकडील प्रवास चिंताजनक आहे. अशा वेळी संतसाहित्य हे वरदायी आशेचा किरण म्हणून सामोरे येते. साहित्य, इतिहास यांविषयीची पुस्तके प्रकाशित करून त्या माध्यमातून विद्यापीठांनी सामाजिक जाणीवांना आवाहन करीत राहणे आवश्यक आहे. या जाणीवांमधूनच शिवाजी विद्यापीठाला पां.ना. कुलकर्णी, तळाशीकर गुरुजींसारखे लोक भेटले. वीस-वीस वर्षे अथक, अविश्रांत परिश्रम घेऊन ते अशा ग्रंथांच्या संपादनाचे कार्य करतात. त्यांच्या या साधनेला विद्यापीठाने कर्तव्यभावनेतून समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यावेळी म्हणाले, क्रोध, अहंकार, लोभ ही जगातील युद्धाची प्रमुख कारणे आहेत. जगाने संतसाहित्याचा अभ्यास आणि अंगिकार केला असता, तर युद्धाचे प्रसंग ओढवलेच नसते. शिवाजी विद्यापीठाने दर्जेदार ग्रंथवैभव वाढविण्यासाठी सदैव प्रयत्न केले आहेत. त्याचे फलितस्वरूप आजची प्रकाशने आहेत.

यावेळी डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी आपले वडील पां.ना कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीच्या संधीप्रकाशात त्यांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरीचे प्रकाशन होणे ही हृद्य बाब असल्याचे सांगितले. अरुण जाधव यांनी तळाशीकर गुरुजींनी संपादित केलेली तुकारामबोवांची गाथा आणि कान्होबा अभंगगाथा या दोन्ही पुस्तकांच्या जनआवृत्ती काढण्यासाठी विद्यापीठाने प्रयत्न करावेत, अशी सूचना केली.

संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. मेधा पानसरे यांनी त्यांच्या संपादित पुस्तकांविषयी उपस्थितांना अवगत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.कार्यक्रमास वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, कुलकर्णी कुटुंबीय, जाधव कुटुंबीय, तळाशीचे ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 6 OCT 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कालिदास, तुकारामांच्या काव्यात मानवी तत्वज्ञान

## माजी कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन

**महाकवी कालिदास आणि संत तुकाराम यांच्या काव्यांमध्ये मानवी जीवनामधील तत्वज्ञान सांगण्याच्या पध्दतीमध्ये साम्य आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासन आणि अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या सेवापूर्तीनिमित्त विशेष कार्यक्रम महाकवी कालिदास 'मेघदूत' कथन आणि विवेचन कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये केले होते. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सत्कार कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मान्यवर.

पुढे बोलताना माजी कुलगुरू डॉ. साळुंखे म्हणाले, शास्त्रीय संस्कृत काव्यांचे सम्राट म्हणजे कवी कालिदास. संत तुकारामांचे अभंग जीवनाशी आणि भक्तीशी जोडले आहे. दोघांच्या काव्यामध्ये रसिकता आणि माधुर्य आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांनी त्यांच्या सेवाकालखंडामध्ये अतिशय मनापासून सेवा दिलेली आहे. विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि विविध अधिकारमंडळांचे पदाधिकारी म्हणून उत्तम कार्य त्यांनी केलेले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, कोणत्याही क्षेत्रामध्ये स्थैर्य फार महत्वाचे असते. त्याशिवाय विकास होत नाही आणि विकासशिवाय प्रगती होत नाही.

संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. धनश्री लेले 'मेघदूत' कथन आणि विवेचनामध्ये म्हणाल्या, कवी कालीदास जेव्हा एखादी गोष्ट सांगतात तेव्हा त्याला प्रमाण देतात. मेघदूत वाचनाने प्रत्येक वेळेस एक नवी दृष्टी प्राप्त होत असते. याप्रसंगी, अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठानचे अजय देशपांडे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. धनश्री लेले यांना मान्यवरांच्या हस्ते मानपत्र देऊन सत्कार केला. डॉ. गौरी कहाते यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ.नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, कहाते कुटुंबीय, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ

# कालिदास, तुकारामांच्या तत्त्वज्ञान सांगण्याच्या पद्धतीत साम्य

## डॉ. साळुंखे : विद्यापीठात 'मेघदूत' कथन

कोल्हापूर, ता. ५ : 'शास्त्रीय संस्कृत काव्यांचे सम्राट म्हणजे कवी कालिदास. संत तुकारामांचे अभंग जीवनाशी आणि भक्तीशी जोडले आहेत. दोघांच्या काव्यामध्ये रसिकता आणि माधुर्य आहे. त्यांच्या काव्यांमध्ये मानवी जीवनामधील तत्त्वज्ञान सांगण्याच्या पद्धतीमध्ये साम्य आहे', असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात संत तुकाराम अध्यासन आणि अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान कोल्हापूरतर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित 'मेघदूत' कथन आणि विवेचन कार्यक्रमात ते बोलत होते.

संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. धनश्री लेले यांनी 'मेघदूत' कथन आणि विवेचन केले. कवी कालिदास जेव्हा एखादी गोष्ट सांगतात तेव्हा त्याला प्रमाण देतात. मेघदूत वाचनाने प्रत्येक वेळेस एक नवी दृष्टी प्राप्त होत असल्याचे त्यांनी सांगितले. अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठानचे अजय देशपांडे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. लेले यांना मान्यवरांच्या हस्ते मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. गौरी कहाते यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, कहाते कुटुंबीय उपस्थित होते. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



### विद्यापीठ-समाज एकत्र येण्याकडे लक्ष हवे

- कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठ आणि समाज दोघेही एकत्र कसे येतील, एकमेकांशी बांधले जातील, याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. त्यात अध्यासनांचे कार्य मोठे आहे.' प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'कोणत्याही क्षेत्रामध्ये विकास, प्रगतीसाठी स्थैर्य फार महत्त्वाचे असते. विद्यापीठाला स्थैर्यता देण्याचे कार्य कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवला तरच विद्यापीठ आणि पर्यायाने समाजाचा विकास होतो.'

0 6 OCT 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात संख्याशास्त्र विभाग सभागृहाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संख्याशास्त्र अधिविभागासाठी अत्याधुनिक आणि प्रशस्त अशा सभागृह उभारणीच्या रूपाने या विभागाच्या सर्वच पूर्वसुरींनी पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता केल्याचे समाधान वाटत आहे, अशी कृतज्ञ भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या भव्य आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज सभागृहाचे उद्घाटन शनिवारी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यांनी या सभागृहामुळे विद्यापीठाच्या वैभवात एक नितांत सुंदर भर पडल्याची भावना व्यक्त केली. डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत केले. अधिविभाग प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी संख्याशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते कोनशिला अनावरण करण्यात आले, तर कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते फीत कापून इमारतीत प्रवेश करण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहाचे उद्घाटनप्रसंगी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. शशिभूषण महाडिक आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)**

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. डी. एन. काशीद, डॉ. एच. व्ही. कुलकर्णी, डॉ. संतोष सुतार, डॉ. कृष्णा पाटील, संगणक विभाग संचालक अभिजित रेडेकर, अभियांत्रिकी उपकुलसचिव रणजित यादव यांच्यासह संख्याशास्त्र अधिविभागाचे शिक्षक, अभियांत्रिकी, संगणक, इंटरनेट आदी विभागांचे अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2025
पुण्यनगरी

# ‘संख्याशास्त्र सभागृहा’च्या उद्घाटनाने समाधान

## – कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के



कोल्हापूर : प्रतिनिधी

संख्याशास्त्र अधिविभागासाठी अत्याधुनिक आणि प्रशस्त अशा सभागृह उभारणीच्या रूपाने या विभागाच्या सर्वच पूर्वसुरींनी पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता केल्याचे समाधान वाटत आहे, अशी कृतज्ञ भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या सुसज्ज सभागृह उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आजचे युग डेटाचे आहे. डेटा विश्लेषणाला मोठे महत्त्व आहे. त्यामुळे या विषयाला प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या विद्यार्थ्यांच्या एकत्रित व्याख्यानांसाठी मोठ्या सभागृहाची आवश्यकता होती. विद्यार्थ्यांनी आणि विद्यापीठाने या सुविधेचा वापर करावा. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी या सभागृहामुळे विद्यापीठाच्या वैभवात एक नितांत सुंदर भर पडल्याची भावना व्यक्त केली. डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत, अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी विद्यार्थ्यांच्या हस्ते कोनशिला अनावरण झाले, तर कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते फीत सोडवून इमारतीत प्रवेश करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. डी. एन. काशीद, डॉ. एच. व्ही. कुलकर्णी, डॉ. संतोष सुतार, डॉ. कृष्णा पाटील, अभिजित रेडेकर, रणजित यादव, डॉ. गिरीश कुलकर्णी, कल्याण देवरूखकर, अमित कांबळे, विजय पोवार, शिवकुमार घ्याडे, रवी सातपुते आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ



कोल्हापूर : आयडिया लॅबसाठी ५० लाख रुपयांच्या दायित्व निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना सचिन मेनन. शेजारी मान्यवर.

# 'आयडिया लॅब'साठी मेनन समूहातर्फे ५० लाखांचा निधी

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (ए.आय.सी.टी.ई.)-'आयडिया लॅब' (आयडिया डेव्हलपमेंट, इव्हॅल्युएशन अँड ॲप्लिकेशन लॅब) स्थापित करण्यासाठी मेनन समूहातर्फे सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) अंतर्गत ५० लाख रुपयांच्या निधीचा धनादेश मेनन समूहाचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे हस्तांतरित केला.

मेनन म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ हे असे ठिकाण आहे, जिथे तरुण मने घडवली जातात. उद्योग जगतातील लोक म्हणून आम्ही व्यवसायासाठी योग्य परिसंस्था तयार करू शकतो, परंतु खरी शैक्षणिक आणि विषयानुषंगिक जडणघडण फक्त विद्यापीठच करू शकते. स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथून बाहेर पडणारे विद्यार्थी उद्योग क्षेत्राशी थेट जुळवून घेऊ शकतील, तसेच उद्योग जगतातील घडामोडींचा अचूक वेध घेऊ शकतील, या दृष्टीने आयडिया लॅब उपयुक्त ठरणारी आहे. ही लॅब या भागातील सर्वाधिक गुणवत्तापूर्ण होण्याकरिता मेनन समूह सदैव विद्यापीठाबरोबर राहील.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयडिया लॅबसाठी ५० लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना मेनन समूहाचे चेअरमन सचिन मेनन. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

# शिवाजी विद्यापीठ 'आयडिया लॅब'साठी मेनन समूहातर्फे ५० लाखांचा निधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (ए.आय.सी.टी.ई.) आयडिया लॅब (आयडिया डेव्हलपमेंट, इव्हॅल्युएशन अँड ॲप्लिकेशन लॅब) स्थापित करण्यासाठी मेनन उद्योग समूहातर्फे सामाजिक दायित्व निधी अंतर्गत ५० लाख निधी देण्यात आला. निधीचा धनादेश मेनन समूहाचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे देण्यात आला.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेसचे संचालक डॉ. एस. डी. डेळेकर, सुभाष माने, हर्षवर्धन पंडित उपस्थित होते. मेनन समूहातर्फे कार्यकारी संचालक शरण्या मेनन, देविका मेनन, निवेदिता मेनन, समूहाचे प्रेसिडेंट आर. डी. दीक्षित, व्हाईस प्रेसिडेंट अमित देशपांडे व मिलिंद धोपेश्वरकर, प्रमोद सूर्यवंशी, अनिल पुरोहित, योगेश देशमुख उपस्थित होते. संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी प्रास्ताविक, तर आयडिया लॅब समन्वयक डॉ. पी. डी. पाटील यांनी आयडिया लॅबची माहिती दिली. लॅबचे सह-समन्वयक डॉ. एस. बी. चव्हाण यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागातर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये माजी विद्यार्थी मेळावा घेण्यात आला.

# माजी विद्यार्थ्यांचा आठवणींना उजाळा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील मेळाव्यात संख्याशास्त्र अधिविभागाचे १९८५ ते २०२५ पर्यंतच्या विविध बॅचमधील सुमारे १४० माजी विद्यार्थी, तसेच १०० आजी विद्यार्थी सहभागी झाले. त्यातील माजी विद्यार्थ्यांनी आठवणींना उजाळा देत विद्यार्थीदशेतील अनुभव, शैक्षणिक प्रवास, व्यावसायिक यशोगाथा मांडल्या.

'या अधिविभाग आणि विद्यार्थ्यांच्या कारकिर्दीसाठी आपले मार्गदर्शन व सहकार्य सदैव उपलब्ध असेल', अशी ग्वाही माजी विद्यार्थ्यांनी दिली. या मेळाव्याचे उद्‍घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी डॉ. डी. एन. काशीद, एच. व्ही. कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

माजी विद्यार्थी आणि विभागातील पीजी विद्यार्थ्यांमध्ये संवाद सत्र घेण्यात आले. यावेळी भावी करिअरच्या संधी, सांख्यिकी शिक्षणाची उपयुक्तता आणि उद्योग-जगतातील डेटा सायन्सचे महत्त्व, या विषयांवर चर्चा झाली. माजी विद्यार्थी समन्वयक डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी विभागाचा आढावा सादर केला. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले. डॉ. सचिन पाटील, प्रा. संजय गांजवे, संजय पाटील, अमोल चव्हाण, तुकाराम कांबळे, उल्का दिंडे यांनी मेळाव्याचे संयोजन केले.

## माजी विद्यार्थी तेजस्वी तारे

■ 'विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी हे आपल्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रांत झळकणारे तेजस्वी तारे आहेत. त्यांचा शिक्षक म्हणून आम्हाला अतिशय अभिमान वाटतो', असे गौरवोद्‍गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले.

0 6 OCT 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वनस्पतींपासून तयार केले 'कीटकनाशक'

## शिवाजी विद्यापीठाचे संशोधन ; वनस्पतींच्या दुधाळ रसापासून बनविलेल्या जैवकीटकनाशकाला जर्मन पेटंट

- युफोर्बिएसी कुळातील वनस्पतींचा वापर
- कोबी, मिरचीवरील मावा, फुलकिड्यांवर प्रभावी

**कोल्हापूर : आशिष शिंदे**

साबरकांड, शेराचे झाड या शेंदरी कुळातील वनस्पतींच्या दुधाळ रसावर (लॅटेक्स) प्रक्रिया करून कीड नियंत्रण करणारे जैवकीटकनाशक शिवाजी विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांनी तयार केले आहे. युफोर्बिएसी कुळातील या वनस्पतींच्या रसाचा वापर करून बनविलेल्या बायोपेस्टिसाईड फॉर्म्युलेशनला जर्मनीकडून उपयुक्त पेटंट मिळाले आहे. कोबी, मिरची, वांगी यासारख्या पिकांवरील मावा, फुलकिडे, पांढऱ्या माश्यांवर हे जैवकीटकनाशक प्रभावी असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

युफोर्बिएसी हे जगभर पसरलेले मोठे वनस्पती कुळ असून, त्यातील अनेक जातींमध्ये पांढरट दुधाळ रस आढळतो. या रसामध्ये जैव सक्रिय घटक असतात. त्यामध्ये कीटकनाशक, जीवाणूनाशक व बुरशीनाशक गुणधर्म असतात.





### नैसर्गिक रसायनांनी समृद्ध

युफोर्बिएसी हे एक वनस्पतींचे मोठे कुळ आहे, ज्याला मराठीत दूधवर्गीय वनस्पती म्हणतात. वनस्पतींच्या या कुळात ३०० पेक्षा जास्त प्रजाती आणि ७ हजार ५०० हून अधिक जाती आहेत. या कुळातील बहुतांश वनस्पतींचे खोड, पाने किंवा फळ कापल्यावर दुधाळ पांढरट रस बाहेर येतो. हा रस नैसर्गिक रसायनांनी समृद्ध असतो.

### असे झाले जैवकीटकनाशक

या वनस्पतींच्या खोडातून आणि पानांतून दुधासारखा रस गोळा करण्यात आला. नंतर हा रस थंड तापमानात वाळवून त्याची बारीक पावडर करण्यात आली. या पावडरला पर्यावरणास सुरक्षित अशा द्रव पदार्थामध्ये (हरित सॉल्व्हेंट) मिसळून आणि औषध पानांवर नीट पसरावे म्हणून विशेष मिश्रक (सर्फक्टंट) घालून द्रवरूप जैवकीटकनाशक तयार करण्यात आले.

> "जैवकीटकनाशकामुळे शेतकऱ्यांचे रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करता येईल. पिकांवरील अवशेष आणि पर्यावरणीय प्रदूषण टाळण्यास मदत होईल व शाश्वत शेतीला चालना मिळेल.
> **- सागर जाधव**, संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ

संशोधकांनी साबरकांड (युफोर्बिया अँटिक्वोरम) आणि शेराचे झाड (युफोर्बिया तिरुकल्ली) या वनस्पतींतील दुधाळ रसावर प्रयोग करून कीटकनाशक तयार केले आहे.

हे कीटकनाशक कोबीवरील मावा (ब्रेविकोरीन ब्रॅसिका) आणि मिरचीवरील फुलकिडे (थ्रिप्स परविस्पिनस) यासारख्या वनस्पतींतील रसशोषक किडींवर प्रभावी आहे. याशिवाय नैसर्गिक पॉलिमर घटकांमुळे औषध फवारणीनंतर पिकांच्या पानांवर अधिक काळ टिकते व पावसामुळे धुवून जाण्याची शक्यता कमी होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2025
लोकमत

# कुलगुरू, प्रकुलगुरूंना आज निरोप

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याबद्दल आज सोमवारी दुपारी ३ वाजता राजर्षी शाहू सभागृहात त्यांना विशेष समारंभात निरोप देण्यात येणार आहे. यावेळी विद्यापीठातील सर्व विद्यार्थी, अधिकार मंडळाचे सदस्य, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच सेवक उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 OCT 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ कबड्डी संघाची अखिल भारतीय स्पर्धेकरिता निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इंदोर (मध्य प्रदेश) येथे चालू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा संघ डॉ. होमी भाभा विद्यापीठ मुंबई या संघावर विजय प्राप्त करून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

अत्यंत चुरशीने झालेल्या या सामन्यामध्ये मध्यंतरापर्यंतचा स्कोर शिवाजी विद्यापीठ १४ व होमी भाभा विद्यापीठ १३ असा होता.

अंतिम पाच मिनिटांमध्ये सौरभ फगरे यांच्या चढाया व अवधूत आदित्य पवार यांनी केलेल्या पकडींच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाने हा सामना सहा गुणांनी जिंकला (३२-२८). देवेंद्र बिरनाळे, संजय पाटील संघाचे प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत. प्राचार्य बाबासाहेब उलपे (अध्यक्ष) आणि अयुब कच्ची यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज माध्यम संवाद परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठ विकास मंच, वृत्तपत्र विद्या व जनसंपर्क विभाग आणि विश्व संवाद केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ६) सकाळी ११.३० वाजता निलांबरी हॉल, वनस्पतिशास्त्र अधिविभाग येथे 'माध्यम संवाद परिषद- २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत राज्याचे उच्चशिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांचे 'ट्रम्प.. टॅरिफ आणि मीडिया' या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. विद्यापीठ विकास मंचचे प्रांत संयोजक एन. डी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, वृत्तपत्रविद्या व जनसंपर्क विभाग प्रमुख प्रा. डॉ. निशा मुंडे, विद्यापीठ विकास मंचचे निमंत्रक स्वागत परूळेकर यांनी केले आहे.